Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**प्राधिकृत प्रकाशन**

वर्ष ११, अंक ३४] गुरुवार ते बुधवार, ऑगस्ट २१-२७, २०२५/श्रावण ३०-भाद्रपद ५, शके १९४७ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १०.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक–अमरावती विभागीय पुरवणी

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **भाग एक-शासकीय अधिसूचना :** नेमणुका, पदोन्नती, अनुपस्थितीची रजा (भाग एक-अ, चार–अ, चार-ब व चार–क यांमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | नाही. |
| **संकीर्ण अधिसूचना :** नेमणुका इ. इ., केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश. | १-२ |
| **भाग एक-अ.**—(भाग चार-ब यामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ अमरावती विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम याअन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना. | नाही |

## शासकीय अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

नाही.

## संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इत्यादी

भाग १ (अ. वि. पु), म. शा. रा., अ, क्र. २१४.

**जिल्हाधिकारी, यांजकडून**

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम १९ खालील अधिसूचना**

क्रमांक-म.सहा-भूसंपादन-कावि-७५७-२०२५.—

ज्याअर्थी, समूचित शासन असलेल्या यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यापुढे ज्याचा निर्देश " उक्त अधिनियम " असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक-म.सहा-भूसंपादन-कावि-८०-२०२४, दिनांक २४ मे, २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची-दोनमध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, यवतमाळ जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे ;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीमध्ये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची-तीनमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबियाच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-चारमध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव, जि. यवतमाळ यांना पदनिर्देशित करीत आहे.

## अनुसूची-एक

## संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०३-४७-२०२०-२१, गांव-दहेगांव खंड-२, तालुका-राळेगांव, जिल्हा-यवतमाळ.

| अ. क्र. (१) | भूधारकांचे नांव (२) | भूसंपादन किंवा गट क्रमांक (३) | अंदाजित क्षेत्र (४) हे. आर |
|---|---|---|---|
| १ | श्री. निवलचंद कैलास पवार | २५ | ० ७३ |
| | | एकूण . . | ० ७३ |

## अनुसूची-दोन

## सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- डिंगडोह संग्राहक ल. पा. योजनेच्या बुडीत क्षेत्राकरीता.

प्रकल्प कार्याचे वर्णन :- डिंगडोह संग्राहक ल. पा. योजनेच्या बुडीत क्षेत्राचे बांधकामाकरीता.

समाजाला मिळणारे लाभ :- या प्रकल्पाद्वारे नजिकचे शेतजमिनीस सिंचनाचा फायदा होणार असून लाभक्षेत्रातील संबंधित शेतकऱ्यांना सिंचनासाठी फायदा घेता येईल. त्यामुळे त्यांचे कृषि उत्पन्नात भर पडून जिवनमान उंचावणार आहे. तसेच, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

## अनुसूची-तीन

## पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

जमिनीचे वर्णन :- डिंगडोह संग्राहक ल. पा. योजनेच्या बुडीत क्षेत्राचे बांधकामाकरीता.

गांव :- मौजा दहेगांव खंड-२, ता. राळेगांव, जिल्हा यवतमाळ.

| अ. क्र. (१) | भूधारकांचे नांव (२) | भूसंपादन किंवा गट क्रमांक (३) | अंदाजित क्षेत्र (४) हे. आर |
|---|---|---|---|
| १ | श्री. निवलचंद कैलास पवार | २५ | ० ७३ |
| | | एकूण . . | ० ७३ |

## अनुसूची-चार

## पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश

— निरंक —

**टीप :-** उक्त जमिनीच्या आराखड्यामध्ये उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, राळेगांव यांचे कार्यालयात निरीक्षण करता येईल.

यवतमाळ :
दिनांक ५ ऑगस्ट, २०२५.

**विकास मीना,**
जिल्हाधिकारी, यवतमाळ.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.